# <u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>

## प्रेस नोट दि.२८/१०/२०१८

## <u>दि.२७/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४२९/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | स्मीता सहाय,वय-३५ वर्षे, रा-बांद्रा वेस्ट, मुबंई |
| **आरोपी** | १)स्विफ्ट कार वरील चालक २)एका हॉस्पीटल मधील उपचार करणारे डॉक्टर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ ते दि.१२/१०/२०१८ रोजीचे दरम्यान पुणे सोलापुर रोड वरील ख्रिश्चन स्माशन भुमीचे पुढे व हॉस्पीटल फातीमानगर, पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी,यातील फिर्यादी यांचे वडील नामे-अधर कुमार, हे त्यांचे कडील ॲक्टीव्हा गाडीवरुन मगरपट्टा येथुन फर्ग्युसन महाविद्यालयकडे जात असताना सकाळी ०८/३० वा चे सुमारास ते पुणे सोलापुर रोडवरील क्रोमा चौकाचे थोडे पुढे असलेले ख्रिश्चन स्माशन भुमीचे जवळ आले असता त्यांचे मागील असलेली स्विफ्ट कार वरील चालकाने त्यांची कार बेदरकारपणे तसेच वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवुन फिर्यादी यांचे वडीलांना पाठीमागुन धडक देवुन त्यांना जखमी होण्यास कारणीभुत झाला व फिर्यादीचे वडील अपघातानंतर उपचार घेत असलेले हॉस्पीटल फातीमा नगर पुणे मधील डॉक्टरांनी ही फिर्यादीचे वडीलांची उपचारादरम्यान आलेली उलटी फुफुसामध्ये जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असताना व ती त्यांची जबाबदारी असताना त्याकडे दुर्लक्ष करुन त्यांचे मृत्युस कारणीभुत झालेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.पी.बागुल ९६७३५७८४४६ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३४४/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | रामचंद्र कुंभार, पो.शि.विमानतळ पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपी** | प्रदीप बाबासाहेब माने वय २८ वर्षे,धंदा.ड्रायव्हर रा.मु.पो. वरवंड,ता.दौंड,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/१०/२०१८ रोजी सकाळी १०/३० वा.चे सुमारस आकाश ढाब्या समोर,लोहगाव वाघोली रोड,लोहगाव,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील ट्रक हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी इसम नामे-उत्तम नारायण काळभोर,वय ६० वर्षे,रा.वाकवस्ती,लोणी काळभोर,ता.हवेली,जि.पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.के.कटके ७०५७६६८५२१ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे ३१८/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | मोहीत पवार, वय- १७ वर्षे,रा. मु.पो.तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे |
| **आरोपी** | १)सागर त्रिंबक ढवळे,वय-२१ वर्षे,रा.जगदीश सायकल मार्टजवळ,भाजी मंडई,१३ ताडीवाला रोड, पुणे. २) त्याचा दोन साथीदार (अ.क्र.१ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/१०/२०१८ रोजी १७.४५ वा.चे सुमारास देवजीबाबा चौकाजवळ, सार्वजनीक रोडवर कसबा पेठ, पुणे. |
| **तपशिल** | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे दिनांक २२/१०/२०१८ रोजी सायं. ०५/४५ वा.चे सुमारास देवजीबाबा चौक,येथुन एका भाडोत्री रिक्षाने एका सह प्रवाशाबरोबर प्रवास करीत असताना,एका पांढ-या रंगाच्या ॲक्टीव्हा गाडीवरील तीन मुले आली व त्यांनी रिक्षाचे मागुन येवुन रिक्षा आडवुन थांबवुन,त्यांचेपैकी ॲक्टीव्हा वरील मागे बसणा-या दोन मुलांनी रिक्षात अचानक बसुन फिर्यादी यांना हाताने मारहाण करून,फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशातुन ७ हजार ३००/- रु.रोख रक्कम जबरदस्तीने काढुन चोरून नेले. तसेच फिर्यादी यांचे सोबत प्रवास करणा-या एका अज्ञात इसमाच्याही खिशातुन काही तरी जबरदस्तीने काढुन घेवुन ते पुन्हा ॲक्टीव्हा गाडीवर बसुन निघुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.डी.पाटील ९७०२९७९०९० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५६४/१८,भादविक ३५३,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | श्रीमती भारती कुंभार,वय ३४ वर्षे,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | १)मंगल अरुण सोकांडे,वय-४८ वर्षे,रा.सर्व्हे नं. २८/६, रो हाऊस नं.७,आंबेगांव पठार पोलीस चौकी समोर,पुणे २)अजिक्य अरुण सोकांडे,वय-२४ वर्षे,रा.सदर (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/१०/२०१८ रोजी दुपारी १२/३० ते दुपारी ०३/०० वा.चे दरम्यान आंबेगांव पठार येथील एका शाळेमध्ये, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या नमुद शाळेत शिक्षका असुन, त्या त्यांचे काम करत असलेल्या आंबेगांव पठार येथील शाळेत इयत्ता ०१ ली ते इयत्ता ०७ वी पर्यतच्या विद्यार्थ्याची प्रथम सत्राची परिक्षा घेत असताना, फिर्यादी यांचे संस्थेच्या सचिव मंगल अरुण सोकांडे, व त्यांचा मुलगा अजिक्य अरुण सोकांडे, यांनी फिर्यादी मुलांची परिक्षा घेण्याचे शासकीय कर्तव्य बजावत असताना, फिर्यादी ज्या मुलांनी मागील वर्षी शाळेची फी भरली नाही अशा मुलांना परिक्षा देण्यापासुन वंचित ठेवण्याकरीता मंगल सोकांडे यांनी फिर्यादीचा हात धरुन वर्गातुन बाहेर काढुन निलंबित करण्याची धमकी देऊन, सहशिक्षक व विद्यार्थ्यासमोर अपमानित करुन फिर्यादीसह सहशिक्षकांना शिवीगाळ करुन, शासकीय कर्तव्य बजावण्यास अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एम.एम. साळुंखे ९५५२८३५३९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५६३/१८,भादविक ४२०,४१९,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | वैभव चिंचोलकर,वय २३ वर्षे,रा.नऱ्हे धायरी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/१०/२०१८ रोजी १२/०० वा.चे सुमारास फिर्यादी यांचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, फिर्यादी यांचे मोबाईलवर फोनवर अज्ञात महिलेने फोन करुन, ॲक्सिस बँकेच्या क्रेडिट व डेबिट कार्ड मोनिटरींग टिम मधुन बोलत असल्याचे सांगुन आपल्या कार्डची वैदयता संपणार असुन त्यावरील रिवार्ड पॉईन्टस आपल्या खात्यात जमा करणे आहे असे सांगुन, फिर्यादी खात्यातील वेळोवेळी असे एकुण ७९ हजार ८६३/- रुपये काढुन घेवुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी. (गुन्हे) संगिता यादव ८१०८२५११०० |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७०३/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला, वय ७२ वर्षे,रा.कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | आठ अज्ञात मोबाईल धारक व बँक खाते धारक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/१०/२०१८ रोजी ते १०/१०/२०१८ रोजी पर्यंत ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी यांना मोबाईल धारकांनी फोन करुन, रोलेक्स घडयाळाचे पार्सल दिल्ली एअरपोर्ट येथे आले असुन ते सोडविण्यासाठी वेगवेगळया बँकेच्या अकाऊंटवर एकुण ६ लाख ८१ हजार रु.फिर्यादीस पार्सल सोडविण्यासाठी वेगवेगळया कारणासाठी भरण्यास सांगुन फिर्यादी यांची नमुद रक्कमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) महादेव कुंभार ८१०८००५५३७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**